| Seat No. | |
|---|---|

**PD - 32**

**Total No. of Pages : 10**

# Ph.d Entrance Examination March/April, 2026
# मराठी (Marathi)
# Subject Code : 58767

---

**Day and Date : Tuesday, 06-10-2026** **Total Marks : 100**

**Time : 04.00 p.m. to 06.00 p.m.**

---

**Instructions :**

1) All questions are compulsory.
2) Each question carries 2 marks.
3) Answers should be marked in the given OMR answer sheet by darkening the appropriate option.
4) Use black ball point pen only for marking the circle. Do not make any stray mark on the OMR answer sheet.
5) Follow the instructions given on OMR Sheet.
6) Rough work shall be done on the sheet provided at the end of question paper.
7) Only non-programmable calculators are allowed.

---

१. संशोधनाची 'नवीन शोध लावण्याची क्रिया, तपासणी आणि चौकशी म्हणजे संशोधन' अशी व्याख्या कोणत्या कोशात आहे?

अ. कँडी ब. दाते-कर्वे

क. मो. रा. वाळिंबे ड. केतकर

२. 'एखाद्या घटनेबाबत नवी मर्मदृष्टी संपादित करणे,' हे कोणत्या पद्धतीच्या संशोधनाचे उद्दिष्ट असते?

अ. रचनात्मक ब. निदानात्मक

क. अभ्युपगम परीक्षणात्मक ड. वर्णनात्मक

३. 'आपल्या अनुभवातील नियमिततांचे संक्षिप्त वर्णन करणे,' ही कोणती संशोधन पद्धती?

अ. आदिबंधात्मक ब. वैज्ञानिक

क. समाजशास्त्रीय ड. गुणात्मक

४. संशोधनाच्या पाच पायऱ्या कोणत्या संशोधकांनी सांगितलेल्या आहेत?

अ. जॉन ड्युई
ब. रेडमन आणि मोरी
क. जॉन डब्ल्यू. क्रेसवेल
ड. क्लिफर्ड वुडी

५. संशोधनातील गृहीतकाचा प्रमुख उद्देश कोणता?

अ. संशोधनाचा आकार वाढवणे
ब. संभाव्य उत्तराची दिशा सूचित करणे
क. संदर्भाची संख्या वाढवणे
ड. निष्कर्ष आधीच निश्चित करणे

६. पुढीलपैकी संशोधन प्रक्रियेचा योग्य क्रम कोणता?

अ. समस्या → निष्कर्ष → माहिती संकलन → गृहीतक
ब. समस्या → गृहीतक → माहिती संकलन →विश्लेषण → निष्कर्ष
क. गृहीतक → निष्कर्ष→ समस्या → विश्लेषण
ड. माहिती → संकलन → निष्कर्ष → समस्या → गृहीतक

७. संशोधनात पूर्वग्रह टाळण्यासाठी कोणती बाब आवश्यक आहे?

अ. वस्तुनिष्ठ दृष्टिकोन
ब. वैयक्तिक मताचा आग्रह
क. पूर्वनिश्चित निष्कर्ष
ड. निवडक माहितीचा वापर

८. साहित्यशास्त्रातील 'तृष्णेचे काव्यशास्त्र' हा लेख कोणी लिहिला आहे?

अ. वा. ल. कुलकर्णी
ब. म. सु. पाटील
क. वा. म. जोशी
ड. बा. सी. मर्ढेकर

९. स्मरणिका आणि गौरविका ही संशोधनाची कोणत्या प्रकारची साधने आहेत?

अ. अविक्रेय साहित्य
ब. वाङ्मयीन साधने
क. ज्ञानकोश
ड. अद्वितिय साधने

१०. लेखकाचे विचार, संकल्पना शब्दशः न देता आपल्या भाषेत साररूपाने सुलभपणे नोंदवण्याला काय म्हणतात?

अ. संदर्भसंहिता
ब. शोधसारांश
क. गोषवारा
ड. पुनर्रचना

११. प्रबंध लेखनात संदर्भसूची देताना खालील कोणते आंतराष्ट्रीय मानदंड पाळावे लागतात?

अ. **APA, MLA** ब. **SA, AML**

क. **NEP, NAC** ड. **NEP, MLE**

१२. आपल्या शोधविषयशी संबंधित पूर्व मजकुराचा साररूपाने व समीक्षणात्मक स्वरूपाचा एक वर्णनात्मक अहवाल तयार करणे, हे कशाचे स्वरूप असते?

अ. शोधनिबंधांचे ब. लघुसंशोधनाचे

क. पूर्वाभ्यासाचे ड. प्रबंधाचे

१३. भाषेकडे एक चिन्हांची सरचना म्हणून पाहण्याचा नवा दृष्टीकोन कोणत्या ज्ञानशाखेने दिला?

अ. ऐतिहासिक भाषाविज्ञान ब. वर्णनात्मक भाषाविज्ञान

क. सामाजिक भाषाविज्ञान ड. यापैकी नाही

१४. 'National Manuscript Mission' ही संस्था काय करते?

अ. हस्तलिखितांचे संवर्धन ब. हस्तलिखितांचे मुद्रण

क. हस्तलिखितांचे विघटन ड. हस्तलिखितांचे प्रकाशन

१५. विगमनात्मक आणि निगमनात्मक पद्धती ही कोणत्या संशोधनासाठी वापरली जाते?

अ) तौलनिक ब) तर्कशास्त्र

क) ऐतिहासिक ड) संख्याशास्त्रीय

१६. साहित्यकृतीच्या मूळ स्वरूपापर्यंत शोध घेत जाण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात?

अ) पाठलेखन ब) संहितानिष्ठ संशोधन

क) संहिता चिकिस्ता ड) अनुमान

१७. 'शोधनिबंधाची लेखनपद्धती' हा ग्रंथ यांनी लिहिला आहे.

अ) स. ग. मालशे ब) रमेश वरखेडे

क) दु. का. संत ड) उषा देशमुख

१८. पर्यावरणीय समीक्षेला 'अधिवासशास्त्रीय समीक्षा' हा शब्द कोणी वापरला आहे?

अ. मारुती चितमपल्ली ब. वसंत आवाजी डहाके

क.रा. ग. जाधव ड. माधव गाडगीळ

१९. 'मराठी संशोधनविद्या' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) इरावती कर्वे
ब) रा.ग. जाधव
क) उषा देशमुख
ड) म. सु. पाटील

२०. एखादे तत्त्व किंवा एखादा सिद्धांत नव्याने हाती लागतो त्यास....... संशोधन म्हणतात.

अ) सर्जनशील संशोधन
ब) तथ्यलक्षी संशोधन
क) अन्वयप्रधान संशोधन
ड) संहितानिष्ठ संशोधन

२१. 'संशोधनाचे पद्धतीशास्त्र' हा ग्रंथ कोणी संपादित केला आहे?

अ) रमेश वरखेडे व मंगला वरखेडे
ब) शं.गो. तुळपुळे व दु. का. संत
क) स.ग. मालशे व मिलिंद मालशे
ड) वा. ल. कुलकर्णी व गो. म. कुलकर्णी

२२. महानुभावांच्या सांकेतिक लिपींचे वाचन कोणी केले?

अ. अ. का. प्रियोळकर
ब. शं. गो. तुळपुळे
क. वा. सी. बेंद्रे
ड. वि. भि. कोलते

२३. इतिहास किंवा ऐतिहासिक संशोधनात कशाचा अभ्यास केला जातो?

अ. कालखंडाचा
ब. कालपरिवर्तनाचा
क. काळाच्या तुलनेचा
ड. काळबदलाचा

२४. जीवनाची सर्व अंगे इतिहाच्या कक्षेत येतात, अशी भूमिका कोणी मांडली?

अ. स्पेंगलर
ब. अ‍ॅर्नाल्ह टॉयन्बी
क. रँके
ड. नाल्स

२५. एमिल दुर्खाइम हे कोण आहेत?

अ. मानववंशास्त्रज्ञ
ब. समाजशास्त्रज्ञ
क. भाषावैज्ञानिक
ड. मार्क्सवादी विचारवंत

२६. गंगाधर पाटील यांचा खालीलपैकी ग्रंथ कोणता?

अ) संशोधनाचे पद्धतिशास्त्र
ब) प्रयोगकलांसाठी संशोधनपद्धती
क) समीक्षामीमांसा
ड) पोत

२७. 'प्राचीन मराठी कोरीव लेख' हे पुस्तक कोणाचे?

अ. अ. का. प्रियोळकर    ब. शं. गो. तुळपुळे

क. वा. सी. बेंद्रे    ड. वि. भि. कोलते

२८. संशोधनात द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत कोणी मांडला?

अ. डम स्मिथ    ब. हेगेल

क. कार्ल ह्युम    ड. कॉलिंगवुड

२९. पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकूराला काय म्हणतात?

अ. ब्लर्ब    ब. पाठकोरी

क. पाठराखणी    ड. अंतपाठी

३०. साहित्याचा इतिहास म्हणजे साहित्यातील रूपबंधाच्या स्वायत्त विकासाचा इतिहास, हे सूत्र काणी मांडले आहे?

अ. आर. एस. क्रेन    ब. जस्टीन ॲबॉट

क. कार्ल ह्युम    ड. कॉलिंगवुड

३१. वंश, परिस्थिती आणि युगप्रवृत्ती या तीन परिमाणांनी साहित्याचा इतिहास लिहिता येतो, हे वाक्य कोणाचे?

अ. डम स्मिथ    ब. हिप्पोलित तेन

क. टी. एस. इलियट    ड. कार्ल मार्क्स

३२. गॉर्कीने साहित्याचा इतिहास हा व्यक्तिमत्वाच्या .............. चा इतिहास, हे सूत्र मांडले.

अ. विस्कटलेपणाचा    ब. प्रगतीचा

क. विकासाचा    ड. विघटनाचा

३३. लालित्याचा विकास शहरातूनच होतो, खेड्यातून होत नाही, असे विधान कोणी केले होते?

अ. आनंद यादव    ब. वा. म. जोशी

क. श्री. व्यं. केतकर    ड. नरहर कुरुंदकर

३४. भारतीय महाकाव्यातील दाखले देत येथील पुरुषसत्ताक मूल्यव्यवस्था स्त्रियांच्या परवशतेचे कारण आहे, असे सर्वप्रथम कोणी दाखवून दिले?

अ. बाबासाहेब आंबेडकर ब. सावित्रीबाई फुले

क. ताराबाई शिंदे ड. महात्मा जोतीराव फुले

३५. सामाजिक, सांस्कृतिक प्रक्रियांतील बृहत प्रश्नांचा अभ्यास कोणत्या अभ्यास पद्धतीत होतो?

अ. समाजमनोवैज्ञानिक ब. संस्कृती विमर्श

क. साहित्यशास्त्र ड. तौलनिक

३६. देशातील सर्वात मोठा हस्तलिखित ग्रंथाचा संग्रह कोणत्या ठिकाणी आहे?

अ. सरस्वती महाल ग्रंथालय ब. छत्रपती शिवाजी म्युझियम

क. मुंबई मराठी ग्रंथालय ड. एशियाटिक सोसायटी

३७. संस्कृती संशोधनाची चार पथ्ये कोणत्या अभ्यासकाने सांगितली आहेत?

अ. एमिल डुरखाईम ब. निकोलस गार्नहॅम

क. मॅलिनोवस्की ड. रोला बार्ड्स

३८. 'श्रमिकांच्या संस्कृतीचा अभ्यास' कोणत्या संस्कृती अभ्यास घराण्यात झाला?

अ. रशियन ब. फ्रेंच

क. अमेरिकन ड. ब्रिटिश

३९. स्त्रीवाद ही कोणती विचारप्रणाली आहे?

अ. राजकीय ब. सामाजिक

क. सांस्कृतिक ड. साहित्यशास्त्रीय

४०. स्त्रीत्वाच्या अस्मितेच्या शोधाला प्राधान्य देणारी विचारधारा कोणी रुजवली?

अ. ल्युरी इरिगारे ब. सँड्रा गिल्बर्ट

क. सिमान दि. बोव्हुआर ड. सुझन गुबर

४१. मध्ययुगीन काळात महाराष्ट्राबाहेत कोणत्या ठिकाणी लक्षणीय स्वरूपाची मराठी वाङ्मयनिर्मिती झाली?

अ. इंदोर ब. हैद्राबात

क. ग्वाल्हेर ड. तंजावर

४२. घटितार्थशास्त्रीय संशोधनात अंतः प्रज्ञेच्या साहाय्याने सद्वस्तूंचा शाषध घेण्याच्या प्रक्रियेला कोणी विशेष महत्त्व दिले?

अ. देकार्त — ब. हुसेर्ल

क. बर्कले — ड. हॉकिंग

४३. क्षेत्रिय निरीक्षणाचा वस्तुपाठ म्हणून 'वाघ्या मुरळी' हे कोणाचे पुस्तक महत्त्वाचे मानले जाते?

अ. अनिल अवचट — ब. राजन गवस

क. वसंत राजस — ड. निळू दामले

४४. युरोपीय समाजातल्या आधुनिकतेची मुळे कोणत्या चळवळीत सापडतात?

अ. स्त्रीवादी — ब. बुद्धिवादी

क. पुनुरुज्जीवनवादी — ड. स्वच्छंदतावादी

४५. कोणत्या घटनेने उमराव वर्ग आणि धर्मगुरू यांच्या समाजावर असलेल्या प्रभावाला धक्का बसला?

अ. रशियन राज्यक्रांती — ब. फ्रेंच राज्यक्रांती

क. अमेरिकन स्वातंत्र्यक्रांती — ड. हैती क्रांती

४६. कोणत्या अभ्यासकांनी साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधाचा सर्वप्रथम अभ्यास केला?

अ. लुसिएन् गोल्डमान — ब. जॉर्ज लुकाच

क. इपोलित तेन — ड. मादाम स्ताइल

४७. कोणत्या संशोधनपद्धतीत संशोधकाची भूमिका साक्षीभोक्त्याची असते?

अ. सामाजिकशास्त्रीय — ब. घटितार्थशास्त्रीय

क. मानसशास्त्रीय — ड. अर्थशास्त्रीय

४८. कोणत्या समीक्षापद्धतीमध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची समृद्ध परंपरा आढळते?

अ. मार्क्सवादी — ब. मनोघटितार्थशास्त्रीय

क. मानसशास्त्रीय — ड. तौलनिक साहित्याभ्यास

४९. समाजशास्त्रीय अभ्यास पद्धतीत साहित्यकृतीच्या आकलनासाठी तीन टप्पे सूचवून त्रिस्तरीय अभ्यासाची भूमिका कोणी मांडली?

अ. गो. मा. पावर — ब. के. रं. शिरवाडकर

क. दिगंबर पाध्ये — ड. गो. म. कुलकर्णी

५०. 'प्रभावाभ्यास' ही संकल्पना कोणत्या अभ्यासपद्धतीमध्ये सांगितली गेली आहे?

अ. सामाजशास्त्रीय

ब. भाषांतरविद्या

क. मानसशास्त्रीय

ड. तौलनिक साहित्याभ्यास

❑❑❑

- Rough Work -

**- Rough Work -**